# आकाशवाणी नागपूर,
## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
## सोमवार, दिनांक ०२ ऑक्टोबर २०२३

## ठळक बातम्या

1. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना देशभरातून आदरांजली.
2. स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विशेष मोहिमेचा तिसरा टप्पा आजपासून सुरू.
3. राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पीक विम्याचा अग्रीम जमा करणार असल्याची कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची नागपूर जिल्हयातील शेतीच्या नुकसानाची पाहणी करतांना माहिती.

आणि

4. बुलढाणा जिल्ह्यातील भीषण रस्ते अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू.

********

गांधी जयंती आणि शास्त्री जयंती

देशभरात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली जात आहे. यानिमित्त देशासह जगभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. नवी दिल्लीत महात्मा गांधी यांच्या राजघाट या समाधीस्थळी आज सर्वधर्म प्रार्थना झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं जाऊन पुष्पांजली अर्पण केली. याशिवाय लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि विरोधीपक्ष नेत्यांनी देखील बापूजींना आदरांजली वाहिली. महात्मा गांधी यांच्या सत्य आणि अहिंसा या आदर्शांनी जगाला एक नवीन मार्ग दाखवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे, तर स्वातंत्र्य आणि समानतेसाठी गांधीजींनी केलेला पाठपुरावा आज देखील दीपस्तंभासारखा अढळ आहे, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. महात्मा गांधी यांची कालातीत शिकवण आपला मार्ग प्रकाशमय करत आहे. त्यांचा प्रभाव जागतिक असून तो संपूर्ण मानवजातीला एकता आणि करुणेची भावना पुढे नेण्यासाठी प्रेरित करतो. त्यांच्या स्वप्नातला भारत साकारण्यासाठी

आपण सदैव प्रयत्नशील राहूया, असा संदेश पंतप्रधानांनी दिला आहे. माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचीही आज 119 वी जयंती आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान मोदी यांनी विजयघाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली. लाल बहादूर शास्त्री यांचा साधेपणा, राष्ट्राप्रति समर्पण आणि 'जय जवान, जय किसान' ही ऐतिहासिक साद आजही येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणादायी ठरत आहे. भारताच्या प्रगतीसाठीची त्यांची अतूट बांधिलकी आणि आव्हानात्मक काळातलं त्यांचं नेतृत्व अनुकरणीय आहे, अशा शब्दात पंतप्रधान मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे.

महात्मा गांधी जयंती-विदर्भ

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे वास्तव्य राहिलेल्या वर्ध्याच्या सेवाग्राम आश्रमाला भेट दिली आणि गांधीजींना अभिवादन केले. महात्मा गांधी जयंती निमित्त गोंदिया जिल्हयातील भजेपार गावातील 70 पर्यावरणदूत युवकांनी शांतीचा संदेश देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजचौक भजेपार येथून सायकल रॅली काढली. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या नावाचा जयघोष करत 'सायकल चालवा प्रदूषण थांबवा', 'झाडे लावा झाडे जगवा', असे आवाहन युवकांनी नागरिकांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून तसेच भारताचे माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर आणि कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने त्यांना अभिवादन केले. यवतमाळमध्ये शांती सलोखा सद्भावना रॅली काढण्यात आली. सावित्री ज्योतिराव फुले समाजकार्य महाविद्यालयातून निघालेल्या या रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी 'मजबुती का नाम, महात्मा गांधी' अशा घोषणा दिल्या. नागपूर महावितरण आणि महानिर्मितीच्या काटोल रोड येथील विद्युत भवन कार्यालयातही या महान विभूतींना अभिवादन करण्यात आले.

विशेष स्वच्छता मोहीम

स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या एका विशेष मोहिमेचा तिसरा टप्पा आजपासून सुरू होत आहे. महात्मा

गांधी यांच्या जयंतीचं औचित्य साधून सुरू केलेल्या या मोहिमेचा कालावधी येत्या ३१ तारखेपर्यंत आहे. गेल्या दोन वर्षात अशा प्रकारच्या दोन विशेष मोहिमा आखल्या होत्या. या अंतर्गत सरकारी कार्यालयांमध्ये वापर होत नसलेली सुमारे ९० लाख चौरस फूट जागा मोकळी करण्यात आली आणि त्या जागेचा उत्पादकतेच्या दृष्टीनं योग्य वापर करण्यात आला, अशी माहिती केंद्रीय कार्मिक, तक्रार निवारण आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं दिली आहे. याशिवाय भंगार साहित्याच्या विक्रीतून केंद्र सरकारला ३७० कोटी रुपये मिळाले, तर ४ लाख ५६ हजार तक्रारींचं निवारण करण्यात आलं. या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी साफ-सफाई मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं.

स्टाफ सिलेक्शन कमिशन

स्टाफ सिलेक्शन कमिशन अर्थात कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा लवकरच २२ भारतीय भाषांमध्ये घेतल्या जातील, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी काल केली. सर्व भाषिक उमेदवारांना एकसमान संधी मिळावी ही सरकारची इच्छा असल्याचं ते म्हणाले. नवी दिल्लीत आयोजित भारतीय भाषा परिषदेत ते बोलत होते. यावर्षीपासून या परीक्षा हिंदी आणि इंग्रजीसह एकूण १३ भाषांमध्ये होतात. जेईई, नीट आणि युजीसीच्या परीक्षाही १२ भारतीय भाषांमधून घेतल्या जातात, असं ते म्हणाले.

नोबेल पुरस्कार

कोरोना प्रतिबंधक एमआरएनए प्रकारच्या लशींसाठींच्या निर्मितीसाठी आवश्यक संशोधन करणाऱ्या जोडीला यंदाचा वैद्यक शास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकेतल्या पेनिसिल्वानिया विद्यापीठात कार्यरत मूळच्या हंगेरीच्या प्रा. कॅटलिन कारिको आणि अमेरिकन शास्रज्ञ ड्रू वेसमन हे या पुरस्काराचे मानकरी आहेत.

धनंजय मुंडे

राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याचा २५ टक्के अग्रीम दिवाळीच्या आत जमा करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज नागपूर महानगर आणि जिल्हयात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसानंतर शेतीच्या नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार या परिसरातील पाहणी त्यांनी आज केली. यापूर्वी दोन

दिवसांपूर्वी मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी नागपूर जिल्ह्याचा दौरा केला होता. नागपूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकावर कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव असून त्यामुळे या पिकाचे नुकसान झाले आहे. तसेच अतिवृष्टी आणि बोगस रासायनिक खते वापरल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कृषीमंत्र्यांनी आज स्वतः शेताच्या बांधावर जात पाहणी केली. त्यांनी अडयाळी, उमरगाव, पाचगाव, विरखंडी या गावांना प्रामुख्याने भेटी दिल्या. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये ठिकठिकाणी त्यांना शेतकरी बांधवांनी विविध मागण्यांची निवेदने सादर केली. अनेक ठिकाणी त्यांनी ताफा थांबवून शेतांची पाहणी केली. यावेळी कृषी मंत्र्यानी बांधावरच शेतकऱ्यांना आश्वस्त केले. ते म्हणाले की, यावर्षी राज्यात १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी विक्रमी पीक विमा काढला असून आंतरपिकाचा सुद्धा विमा काढण्यात आला आहे. राज्य शासनाने एक रुपया शेतकऱ्याला भरायला सांगितला होता. उर्वरित विम्याचा प्रीमियम शासनाने भरला आहे. देशात हे पाहिले उदाहरण आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या सर्वांना पीक विम्याच्या नुकसान भरपाईच्या देय रकमेची २५ टक्के रक्कम दिवाळीपूर्वी खात्यामध्ये मिळणार आहे, असे मुंडे यांनी स्पष्ट केलं.

जातनिहाय जनगणना

राज्यातील विविध समाजाचे आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित असताना जातनिहाय जनगणना हाच एक उपाय आहे. त्यामुळे बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करावी आणि याचा कालबध्द कार्यक्रम महायुती सरकारने जाहीर करावा, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. जातनिहाय जनगणना करून सर्व माहिती लोकांसमोर मांडल्याबद्दल बिहार सरकारचे अभिनंदन करत वडेट्टीवार म्हणाले की, काँग्रेसच्या काळात २०११ साली जातनिहाय जनगणना झाली होती. या जनगणनेमध्ये प्रत्येक जातीचा डेटा गोळा केलेला आहे. ती माहिती उघड करावी, ही मागणी राहुल गांधी यांनी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण कायम राहावे म्हणून ही भूमिका मांडली. मात्र त्यातही सरकार वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

अपघात

बुलढाणा तालुक्यात नांदुरा ते मलकापूर रस्त्याच्या लगत झोपडीत झोपलेल्या मजुरांना एका भरधाव आयशर ट्रकने चिरडल्याची घटना आज पहाटे घडली. यात पाच जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. चिखलदरा तालुक्यातल्या

मोरगाव इथले दहा मजूर रोजगाराच्या शोधात भटकंती करत नांदुरा इथं सुरू असलेल्या रस्त्याच्या कामात रुजू झाले होते.

वर्धा-नांदेड नवीन रेल्वे लाईन

वर्धा-नांदेड नवीन रेल्वे लाईनचे कार्य प्रगतीपथावर आहे. १५ किलोमीटर लांबीच्या लाईनचे कार्य पूर्ण झाले असून त्यासाठी १ हजार ८०० कोटींच्या वर खर्च आला आहे. पूर्ण झालेल्या लाईनमध्ये वर्धा -देवळी या विभागाचा समावेश आहे. देवळी ते कळंब  हा टप्पा २३ पूर्णांक ६१ किलोमीटरचा असून तो या वर्षात पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कळंब- नांदेड टप्पा देखील प्रगतीपथावर आहे. वर्धा- नांदेड नवीन लाईनची एकूण लांबी जवळ-जवळ २५८ किलोमीटरची आहे.

हवामान

नागपूरसह पूर्व विदर्भाच्या सर्व जिल्हयात आज पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून मेघगर्जनेसह तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. या शिवाय पश्चिम विदर्भात यवतमाळमध्ये देखील आज पावसाचा येलो अलर्ट  देण्यात आला आहे. आगामी आठवडाभरासाठी पर्जन्यवृष्टीचा अंदाज नाही. दरम्यान, येत्या काही तासात विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती आणि चंद्रपूर जिल्हयात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*******